# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबईतील पश्चिम उपनगरातील वाहतुक कोंडीवर मार्ग काढण्यासाठी नरिमन पॉइंट ते पश्चिम उपनगरातील मालाड-कांदिवली सागरी मार्ग तयार करण्याबाबत

**(१) ६०४९ (०६-०४-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाहतूक कोंडीवर मार्ग काढण्यासाठी नरिमनल पॉईंट ते पश्चिम उपनगरातील मालाड - कांदिवली या 36 किमी चा सागरी मार्ग तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या 10 हजार कोटी रुपयाच्या प्रकल्पासाठी शासनाने सल्लागारांची नेमणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पास केंद्रिय पर्यावरण मंत्रालयाने मंजूरी दिली आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने निर्णय घेतला आहे काय, अद्यापही यासंदर्भात निर्णय घेतला नसल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१७) :** (१) होय.
सदर प्रकल्पाची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुरु आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सल्लागाराची नेमणूक करणेत आलेली आहे.
(३) केंद्र शासन पर्यावरण व वनमंत्रालयाकडील दिनांक ३०.१२.२०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार दिनांक ६.१.२०११ रोजीच्या सीआरझेड अधिसूचनेमधील तरतूदींमध्ये सुधारणांना मंजूरी दिलेली आहे. त्याअनुषंगाने कोस्टल रोडचा प्रस्ताव महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथारिटीकडे मंजूरीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्नाधीन कोस्टल रोडचा विस्तृत प्रारुप प्रकल्प अहवाल हा बृहन्मुंबई महानगरपालिकेने महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जनतेच्या सूचना/हरकतीसाठी २५ जून, २०१५ रोजी उपलब्ध केलेला होता.

सदर रस्त्याच्या प्रारुप प्रकल्प अहवालामध्ये पर्यावरणीय दृष्टिकोनातून मूल्यमापन करण्यात आलेले आहे. पूर्ण प्रकल्पाचे पुनर्विलोकनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सल्लागाराची नेमणूक केलेली आहे. या प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारीचे अवलोकन करणे व नागरिकाच्या सूचना/हरकती विचारात घेवून प्रकल्पाचे पुढील तपशीलवार अंदाजपत्रक/आराखडे बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार करणे अभिप्रेत आहे.

---

**शहरी गरीबांना घरे देण्याकरिता नव्या स्वरूपातील राजीव आवास योजना लागू करण्याबाबत**

**(२) ७४४९ (०६-०७-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने सन २०१४ मध्ये शहरी गरीबांना घरे देण्याकरिता नव्या स्वरूपातील राजीव आवास योजना लागू केली असून यामध्ये ५ लाखांपेक्षा जास्त लोकवस्ती असलेल्या शहरामधील झोपडपट्टी वासियांना घरे देण्याचे निश्चित केल्यानुसार राज्यातील ४६ लहान-मोठया शहराची योजनेकरिता निवड केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सदरहू ४६ शहरांमधील झोपडपट्टी वासियांचे सर्व्हेक्षण केल्यावर २२ लाख झोपडपट्टयातील नागरिकांना घरे देण्याचे निश्चित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ४६ शहरामधील २२ लाख झोपडपट्टी वासियांना घरे देण्याच्या राजीव गांधी योजनेकरिता केंद्र शासनाने निश्चित केलेली घराची किंमत अधिक असल्याने शासनावर २७ हजार कोटींचा तर केंद्र शासनावर ५४ हजार कोटीचा भार पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या योजनेंतर्गत राज्यातील ४६ शहरामधील २२ लाख झोपडपट्टीवासियांना घरे देण्याचे निश्चित केल्यानंतर आजमितीस एकूण किती झोपडट्टीवासियांना राजीव गांधी योजनेंतर्गत घरे देण्यात आली आहे व अद्यापी किती जणांना घरे देणे बाकी आहे,

(५) असल्यास, उर्वरित लाभार्थींना राजीव गांधी योजनेंतर्गत घरे देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. प्रकाश महेता (०४-०५-२०१७) :** (१), (२), (३), (४) व (५) केंद्र शासनाने शहरी भागासाठी राजीव आवास योजना घोषणा केली असून दि.२ जून, २०११ रोजी ३ लाख व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांसाठी लागू करण्यात आली. तसेच दि.२७.९.२०१३ रोजी या योजनेच्या अंमलबजावणीच्या दुसऱ्या टप्प्याची घोषणा करण्यात येऊन त्यामध्ये ३ लाख व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या २४ शहरांमध्ये या योजनेची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली होती. मात्र, राज्य शासनाने ३ लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरांचा समावेश करुन ४६ शहरांचा प्रस्ताव केंद्र शासनास दि.१२.९.२०१३ च्या पत्रान्वये पाठविण्यात आला होता. राज्यातील ४६ शहरांचा समावेश राजीव आवास योजनेअंतर्गत करण्यास केंद्र शासनाने संमती दर्शविली. तथापि, राजीव आवास योजनेच्या राज्यातील अंमलबजावणीबाबत सर्वसमावेशक निर्णय होऊ शकला नाही. तद्नंतर केंद्र शासनाने दि.१९.५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये राजीव आवास योजना बंद करण्यात येत असल्याचे कळविले आहे.

---

**सोलापूर शहरातील कचरा उचलणाऱ्या समीक्षा कन्स्ट्रक्शन कंपनीचे महानगरपालिकेने देयके थकविल्याबाबत**

**(३) १०९५३ (०७-०४-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील कचरा उचलणाऱ्या समीक्षा कन्स्ट्रक्शन कंपनीचे महानगरपालिकेने माहे डिसेंबर, २०१३ पासून तब्बल ३ कोटी ८१ लाख ८६ हजार रुपये थकविले आहेत, त्यामुळे समीक्षा कन्स्ट्रक्शन कंपनी आर्थिक अडचणीत आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समीक्षा कन्स्ट्रक्शन कंपनीची थकलेली देयके देण्यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०४-२०१७) :** (१) व (२) शासनाने दिनांक २१.११.२०१६ च्या पत्रान्वये आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांना सोलापूर महानगरपालिका स्तरावर सुरु असलेली निविदा प्रक्रियाबाबत प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत व सर्व देयकांची नियमानुरुप तपासणी करुन तसेच करारनाम्यातील अटी व शर्ती विचारात घेवून त्यानुसार रक्कम अदा करण्याची कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद महानगरपालिकेच्या सन १९९१ च्या विकास आराखड्यानुसार पैठण रोड ते नाथ व्हॅली मार्गे सातारा-देवळाईला जाणारा ३६ मिटर रुंदीचा रस्ता प्रस्तावित असल्याबाबत**

**(४) १३२५४ (०८-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या सन १९९१ च्या विकास आराखड्यानुसार पैठण रोड ते नाथ व्हॅली मार्गे सातारा-देवळाईला जाणारा ३६ मीटर रुंदीचा रस्ता प्रस्तावित आहे, हा रस्ता बिड बायपासला पर्यायी मार्ग म्हणून आहे, सन २००४ मध्ये नाबार्ड अंतर्गत सदर रस्ता विकसित करण्याचे असून औरंगाबाद महानगरपालिकेच्या नाकर्तेपणामुळे किंवा काही जणांचे हितसंबंध जपण्यासाठी या रस्त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले, परिणामी, या रस्त्यात येत असलेल्या शासकीय जमिनीवर अतिक्रमण झाले, या रस्त्यासाठी महानगरपालिकेचा नगररचना विभाग अतिक्रमण होण्यास व तहसिल कार्यालय औरंगाबाद जबाबदार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणात शासनाने चौकशी समिती नेमून महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, अशासकीय जमीन संपादीत झाली नसल्याने शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटविण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१७) :** (१), (२), (३) व (४) औरंगाबाद महानगरपालिकेच्या १९९१ च्या विकास आराखड्यानुसार पैठण रोड ते नाथ व्हॅली हा ३६.०० मी.रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित आहे. या रस्त्याने बाधित होणाऱ्या स.क्र.१०, मौजे कांचनवाडी या जमिनीवर अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. मात्र सदर जमिन इनाम जमीन असून ती जमीन महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेली नाही. सदर जमिनीवरील अनधिकृत बांधकामे हटविण्यासाठी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या सहकार्याने कार्यवाही करावी, अशी सूचना आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना देण्यात आल्या आहेत.

---

## वंजारी खाण कामगार सहकारी मजूर संस्था तुर्भे, नवी मुंबई या संस्थेची दगडखाण पूर्ववत करण्याबाबत

**(५) १७९९९ (११-०८-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वंजारी खाण कामगार सहकारी मजूर संस्था तुर्भे, नवी मुंबई या संस्थेची नवी मुंबई तुर्भे आणि बोनसरी येथील शासनाकडून रद्द करण्यात आलेली दगडखाण पूर्ववत सुरू करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.राज्यमंत्री, नगरविकास, प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू संस्थेमधील पदाधिकारी हे भटक्या विमुक्त जमातीतील असून संस्थेतील पदाधिकारी व कर्मचारी अशिक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यांच्या अशिक्षितपणामुळे त्यांनी वरील दोन्ही ठिकाणावरील भाडे तत्वावर आरएससी प्लॅन बसविण्यासाठी प्रकाश इंजिनिअरींग, प्रा.लि.या कंपनीस दिला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व लोकप्रतिनिधींच्या मागणी संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला व त्या अनुषंगाने पुढे कोणती कारवाई केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०४-२०१७) :** (१) होय.
(२), (३) व (४) मे.वंजारी खाण कामगार सहकारी मंजूर संस्था, तुर्भे यांना सिडकोकडून मौजे तुर्भे सर्व्हे क्र.३८७ व बोनसरी सर्व्हे क्र. २०३ यामधील एकूण ५२,६५० चौ.मी. क्षेत्रात दगडखाण व क्रशर चालविण्यासाठी दि.१.१०.२००६ ते ३०.९.२०१६ या कालावधीसाठी प्रवेश परवाना करारान्वये देण्यात आला होता.

मे.वंजारी खाण कामगार सहकारी मजूर संस्था यांनी मौजे तुर्भे येथील मंजूर ५२६५० चौ.मी. क्षेत्रापैकी ६००० चौ.मी. क्षेत्र नियमबाह्यरित्या व बेकायदेशीररित्या परस्पर मे.प्रकाश इंजिनियर्स ॲन्ड इन्फ्रा प्रोजेक्टस् प्रा.लि.चेंबूर मुंबई-७१ यांना भाड्याने दिली असल्याचे निदर्शनास आल्याने सदर संस्थेचा प्रवेश परवाना दि.६.८.२०१४ चे पत्रान्वये रद्द करण्यात आला.

तथापि, मौजे बोनसरी सर्व्हे क्र. २०३ मधील क्षेत्र दगडखाण व क्रशरसाठी प्रस्तुत संस्थेसाठी वेगळ्याने मंजूर झाल्याने तसेच सदर दगडखाण व क्रशन यासाठी भूपृष्ठभाडे व पर्यावरण अधिभाराच्या रकमा संस्थेने दि.३०.९.२०१६ या कालावधी पावेतो सिडकोकडे जमा केले असल्याने संस्थेने केलेल्या विनंतीनुसार बोनसरी येथील क्षेत्रातील देण्यात आलेला परवाना सिडकोच्या दि.३०.५.२०१६ च्या पत्रान्वये पुर्ववत सुरु ठेवण्यात आला. चालू असलेल्या दगडखाण व क्रशर यांस मार्च, २०१७ अखेरपर्यंत तात्पुरती परवानगी देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईतील कोट्यावधीच्या भूखंडावरील लीज करार संपूनही कब्जा न सोडल्याबाबत

**(६) २८६२७ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील ताज हॉटेल, रेसकोर्स, हिंदुस्थान पेट्रोलियम, एलआयसी, नॅशनल इन्श्युरन्स, बॅक ऑफ इंडिया, टाईम्स ऑफ इंडिया आणि सेंट्रल बँकसारख्या लीजधारकांनी महापालिकेच्या करोडो रुपयांच्या २३४ भूखंडाचा कब्जा सोडण्यात न आल्याची बाब दि.११ ऑगस्ट, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जमिनीचा कब्जा न सोडल्यामुळे महानगरपालिकेचा करोडो रुपयांचा महसूल बुडत असून, यातील बरेचसे भूखंड १ रुपया इतक्या नाममात्र भाड्याने १० ते ९९ वर्षाच्या लीजवर देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लीज मुदत संपून ५ ते १० वर्षे इतका कालावधी होऊन लीज धारकांनी अटीचा भंग केल्याचे निदर्शनास आले असल्याने यासंदर्भात मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा यांनी मा.मुख्यमंत्री यांना माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने केलेल्या चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार लीज धारकांवर तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०४-२०१७) :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई शहरातील मक्त्याने दिलेल्या मालमत्तांपैकी २४२ मालमत्तांच्या मक्त्यांची मुदत संपुष्टात आलेली आहे. त्यानुषंगाने ताज हॉटेल, रेसकोर्स, हिंदुस्थान पेट्रोलियम, एलआयसी, नॅशनल इन्श्युरन्स, बँक ऑफ इंडिया, टाईम्स ऑफ इंडिया आणि सेंट्रल बँक हे त्यापैकी काही मक्तेदार असुन, त्यांच्या मक्ता नुतनीकरणाची कार्यवाही चालु आहे. सदर मक्तेदारांनी भुखंडाचा कब्जा सोडलेला नसून, सदर भूखंडाचा ताबा या मक्तेदारांकडेच आहे.

मात्र महापालिका धोरणाप्रमाणे आरक्षणाचा प्रश्न उद्भवल्यास किंवा भुभागावर नियमबाह्य घडामोडी आढळल्यास अथवा मक्तेदाराने सहकार्य न केल्यास भुभागाचा ताबा घेता येऊ शकेल.

(२) हे खरे आहे.

मक्ता संपुष्टात आलेले बरेचसे भुखंड हे १ रुपया इतक्या नाममात्र भाड्याने १० ते ९९ वर्षाच्या लिज वर देण्यात आले होते हे ही खरे आहे.

मक्ता नुतनीकरणाचे धोरण नव्याने करण्यात येत असुन धोरणानुसार मक्ता संपुष्टात आलेल्या भुभागांचे मक्ता नुतनीकरणानंतर त्या त्या वर्षाच्या मुद्रांक शुल्क सिध्दगणक दरांनुसार नव्याने मक्ता भुईभाडे आकारण्यात येणार असून ते व्याजासह वसुल करण्यात येईल. त्यामुळे महानगरपालिकेचा महसुल बुडणार नाही.

(३) मा.विरोधी पक्षेनेता, विधानसभा यांनी मा.मुख्यमंत्री यांना ऑगस्ट, २०१५ मध्ये दिलेले पत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेले नाही.

तथापि, मा.विरोधी पक्ष नेते, विधानसभा यांचे दिनांक ०५ सप्टेंबर, २०१५ रोजीचे पत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१५ रोजी प्राप्त झाले असून, सदर पत्रास दिनांक ०३ मार्च, २०१६ रोजी महानगरपालिकेमार्फत उत्तर देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुळगाव बदलापूर नगरपालिका (जि.ठाणे) हद्दीतील भूखंडाची माहिती नगरपालिकेकडे उपलब्ध नसल्याबाबत

**(७) २९७८७ (२१-०१-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिका हद्दीतील सुमारे ११९ आरक्षित भूखंडापैकी जेमतेम ३० ते ४० भूखंडच नगरपालिकेच्या ताब्यात असून उर्वरित भूखंडाबद्दलची माहिती नगरपलिकेकडे उपलब्ध नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले, तदनुसार उर्वरित आरक्षित भुखंड नगरपालिकेच्या ताब्यात घेण्याबाबत व भूखंडांची माहिती उपलब्ध होणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०३-२०१७) :** (१), (२) व (३)

I. नगरपरिषद हद्दीत ११८ आरक्षित जागा आहेत.

II. ४ आरक्षित जागा ताब्यात आल्या असून त्या जागा विकसित केलेल्या आहेत.

III. २ आरक्षणे समावेशक आरक्षणातून विकसित होऊन ताब्यात आलेली आहेत.

IV. ३ जागेच्या आरक्षणाचे समावेशक आरक्षणासाठी जागा मालकाने प्रस्ताव सादर केला असून सहायक संचालक नगररचना यांच्या मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

V. ९ आरक्षणे ही समावेशक आरक्षण विकास पध्दतीने विकसित करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे.

VI. ४० आरक्षणांपैकी काही भूखंडाचे क्षेत्र टिडीआरच्या बदल्यात नगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे.

तथापि सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात आरक्षित भूखंड संपादित करण्यासाठी नगरपरिषदेने दहा कोटीची तरतूद केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिव-प्रेरणा सहकारी गृहनिर्माण संस्था, कुरार व्हिलेज मालाड (पूर्व), मुंबई येथील एसआरए योजनेबाबत

**(८) ३३६३१ (२१-०१-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील मालाड (पूर्व) तानाजी नगर, रोड क्र.३ कुरार व्हिलेज येथील शिव-प्रेरणा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या १५०० झोपडीधारकांनी सन २००६ मध्ये संमतीपत्रके देवूनही अद्याप विकासकातर्फे एसआयए योजना राबविणेबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू एसआरए योजनेस ९ वर्षे इतका विलंब झाला असल्याने झोपडीधारकांच्या मागणीनुसार प्रकल्पातील विकासकाची नियुक्ती त्वरीत रद्द करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदरहू झोपडीधारकांचे विनाविलंब पुनर्वसन व्हावे याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. गृहनिर्माण मंत्री यांना दिनांक ४ मार्च, २०१५ रोजी लेखी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय व त्यानुसार शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२९-०४-२०१७) :** (१) मौजे मालाड, तालुका बोरीवली, मुंबई येथील शिवप्रेरणा सह.गृह.संस्था व इतर अन्य ११ गृहनिर्माण संस्थांच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रस्ताव दि.५/९/२००६ रोजी प्राधिकरणास प्राप्त झाला होता. शिवप्रेरणा व इतर ३ सहकारी गृहनिर्माण संस्थांचे मूळ परिशिष्ट सक्षम प्राधिकारी यांनी दि.२२/८/२०११ रोजी निर्गमित केले होते. त्यामध्ये एकूण १२५२ पैकी ५३१ झोपडीधारक पात्र दर्शविण्यात आले होते.

सदर योजनेमध्ये एकूण ३३६२ झोपडीधारक असून त्यांपैकी १४४३ पात्र झोपडीधारक आहेत. या योजनेतील एकूण १२ पुनर्वसन इमारतींपैकी ४ पुनर्वसन इमारतींचे (४२९ सदनिका) बांधकाम पूर्ण झाले असून एका इमारतीतील १२५ सदनिकांना दि.४/२/२०११ रोजी भोगवटा प्रमाणपत्र दिलेले आहे. इतर सनिकांना भोगवटा प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरु आहे. दि.१६/४/२०१६ रोजी ४ इमारतींचे आराखडे (२५३७ सदनिका) मंजूर करण्यात आले असून इमारती बांधण्यासाठी झोपड्या तोडण्याची प्रक्रिया प्रत्यक्ष जागेवर सुरु करण्यात आलेली आहे.

या योजनेमधील विकास आरखड्यातील रस्त्याचे आरक्षण रिअलाईन करण्यासाठी व नाला वळविण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेची अनुक्रमे दि.४/४/२०१६ व दि.१५/१२/२०१५ रोजी मंजूरी घेण्यात आली आहे. तसेच दि.३/९/२०१४ रोजी पर्यावरण दाखला देखिल प्राप्त केलेला आहे.

(२) विकासकाची नियुक्ती रद्द करण्याचा कोणताही प्रस्ताव प्राधिकरणाला प्राप्त झालेला नसल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधीचे दि.४/३/२०१५ रोजीचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संगमनेर नगरपरिषदेच्या (जि.अहमदनगर) हद्दीतील भूसंपादनासाठी शासनाकडून निधी मिळण्याबाबत

**(९) ४२७१५ (०७-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (जि.अहमदनगर) नगरपरिषद हद्दीतील भूसंपादनासाठी अनेक कामे निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नगरपरिषदेला भूसंपादनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०४-२०१७) :** (१) माहे नोव्हेंबर, २०१५ पुर्वीपासून भुसंपादनाबाबत निधी अभावी प्रकरणे प्रलंबित आहेत.
(२) व (३) मंजूर विकास योजनेनुसार संगमनेर नगरपरिषदेने खाजगी जागेवरील एकूण ६७ आरक्षणे विकसित करावयाची होती. त्यापैकी २ आरक्षणे नगर परिषदेने भूसंपादन करून विकसित केलेली आहेत.

भूसंपादन करुन आरक्षणे विकसित करण्यासाठी नगर परिषदेने स्वनिधीतून तसेच अन्य स्त्रोताव्दारे निधी उभा करणे अपेक्षित आहे.

---

**संगमनेर नगरपरिषदेच्या (जि.अहमदनगर) शाळांसाठी शिक्षक वेतन व इतर आस्थापना खर्च करणे शक्य होत नसल्याबाबत**

**(१०) ४२९८९ (१७-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमनेर नगरपरिषदेची (जि.अहमदनगर) आर्थिक बाजू कमकूवत असल्याने नगरपरिषद शाळांसाठी शिक्षक वेतन व इतर आस्थापना खर्च करणे शक्य होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील नगरपरिषद शाळांसाठी शिक्षक व वेतन व इतर आस्थापना खर्चाचे १०० टक्के स्वतंत्र अनुदान देण्यासोबतच नगरपालिका शिक्षण मंडळास द्यावा लागणारा १० टक्के हिस्सा रद्द करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०४-२०१७) :** (१) संगमनेर नगरपरिषद ही “ब” वर्ग नगरपरिषद असून शालेय शिक्षण विभागाच्या संगमनेर नगरपरिषदेस प्राथमिक शिक्षणावरील मान्य बाबींवरील खर्च भागविण्यासाठी ९०टक्के अनुदान अनुज्ञेय आहे.
(२) व (३) प्राथमिक शिक्षणावरील उर्वरित खर्चाचा भार नगरपरिषदेने शासनाकडून विविध योजनांतर्गत प्राप्त होणाऱ्या निधी व स्वउत्पन्नातून करणे अपेक्षित आहे.

---

**अमरावती व बडनेरा करिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पाठविलेल्या प्रस्तावास मंजूरी व निधी देण्याबाबत**

**(११) ४९६६८ (२८-०४-२०१६). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांनी अमरावती व बडनेरा शहराची वाढलेली लोकसंख्या विचारात घेता रुपये ४८२१.८९ चा अनेक महत्वाची कामे मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाला पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा. पाणीपुरवठा मंत्री व संबंधित अधिकारी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांची संयुक्त बैठक मंत्रालयात झाली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव शासनाकडून मंजूर होऊन निधी संबंधित यंत्रणेला पाठविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०१-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत अमरावती शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेस शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. या योजनेमध्ये सदर प्रस्तावातील सर्व कामे समाविष्ट आहेत. या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून दि.१०.१०.२०१६ रोजी कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत. प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली आहे.

---

## उरण तालुक्यातील जेएनपीटीचा सेझ स्पेशल एकॉनॉमिक झोन या प्रकल्पासाठी १८ गावांची जमिन संपादित करण्यात आल्याबाबत

**(१२) ५२३०९ (२७-०४-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण तालुक्यातील जेएनपीटीचा सेझ स्पेशल एकॉनॉमिक झोन या प्रकल्पासाठी १८ गावांची जमीन गेली व दोन गावे विस्थापित झाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जेएनपीटी बंदरामध्ये चौथा टर्मिनल पोर्ट ऑफ सिंगापूर ॲथॉरिटी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काही गावांचा मच्छिमार व्यवसायही बंद होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच या प्रकल्पग्रस्तांना प्राधान्याने नोकऱ्या व रोजगार देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०१७) :** (१) जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट प्रकल्पासाठी शासनाने सन १९८४-८६ मध्ये उरण तालुकयातील १२ गावांची जमिन संपादित केली होती तसेच शेवा व हनुमान कोळीवाडा या गावांचे पुर्वसन करण्यात आले आहे. या संपादित जमिनीपैकी २७७ हे. जमीन बंदराशी संबंधित विशेष आर्थिक क्षेत्रासाठी आरक्षित आहे.
(२) जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टने पोर्ट ऑफ सिंगापूर ऑथॉरिटीची उपकंपनी मे.भारत मुंबई कंटेनर टर्मिनल प्रा.लि. यांच्याशी मे, २०१४ मध्ये करार केलेला आहे.

(३) जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टच्या जलमर्यादेत नवीन चौथे टर्मिनल पोर्ट होत आहे, त्यामुळे मच्छिमारीच्या व्यवसायावर परिणाम होण्याची शक्यता नाही.
(४) व (५) सदर कराराच्या परिशिष्ट ११ मध्ये प्रकल्पात सामील होऊ इच्छिणाऱ्या प्रकल्पाग्रस्तांना पात्रतेनुसार समावून घेण्याची तरतूद आहे.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिका हद्दीत नव्या बांधकामांना घालण्यात आलेल्या बंदीबाबत**

**(१३) ५४६८८ (२९-०८-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिका हद्दीत नव्या बांधकामांना घालण्यात आलेली बंदी मा.मुंबई उच्च न्यायालयाने दि.२५ एप्रिल, २०१६ रोजी उठविली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंदी उठवितांना मा.उच्च न्यायालयाने कोणत्या अटी व शर्ती बंधनकारक केल्या आहेत,
(३) असल्यास, कल्याण-डोंबिवली महापालिकेने मा.उच्च न्यायालयाने घातलेल्या अटी व शर्तीच्या अंमलबजावणीबाबत कोणती कार्यवाही केली वा अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जनहित याचिका क्र.१८२/२००९ मध्ये मा.उच्च न्यायालयाने घनकचरा व्यवस्थापनाबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने दर २ महिन्यांनी प्रगती अहवाल प्रतिज्ञापत्राच्या स्वरुपात मा.उच्च न्यायालयास सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.
(३) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिकेने घनकचरा व्यवस्थापनाबाबत दि.२०.६.२०१६, दिनांक १२.८.२०१६ रोजी प्रतिज्ञापत्राच्या स्वरुपात प्रगती अहवाल मा.उच्च न्यायालयात सादर केला आहे.

दि.०७.१०.२०१६ रोजी सदर दावा राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांच्याकडे वर्ग करण्यात आला असून, दि.०७.०१.२०१७ रोजी महानगरपालिकेने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी महानगरपालिकेने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला असून, त्यास “स्वच्छ भारत अभियान” अंतर्गत राज्य शासनाची मंजूरी मिळाली आहे. त्यानुसार प्रकल्प अंमलबजावणीची कार्यवाही महानगरपालिकेकडून सुरु असल्याचे आयुक्त, कल्याण - डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एमएमआरडीएच्या माध्यमातून १२ हजार घरे गिरणी कामगारांना उपलब्ध करून देण्याबाबत**

**(१४) ५८८७१ (२९-०८-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमएमआरडीएच्या माध्यमातून परवडणाऱ्या घरांच्या योजनेतील सुमारे १२ हजार घरे गिरणी कामगारांसाठी तातडीने उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदर घरांच्या बाबतीत तातडीने आदेश काढण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :** (१) ते (३) शासनाने दिनांक ४.३.२०१४ रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास त्यांचेकडील भाडे तत्वावरील घरे योजनेंतर्गत, एकंदर ४ प्रकल्पामधील १६० चौ.फुटाच्या दोन सदनिका एकत्रित करुन ३२० चौ.फुटाच्या १०७६८ सदनिका गिरणी कामगारांना उपलब्ध करुन देणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्यापैकी एका प्रकल्पामधील ३२० चौ. फुटाच्या २४१७ सदनिका मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून उपलब्ध करुन देणेत आलेल्या आहेत. त्याची सोडत म्हाडाकडून दिनांक २.१२.२०१६ रोजी काढलेली आहे.

---

**नांदेड जिल्ह्यातील नगीना घाट येथील स्मशानभूमीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१५) ५९०५६ (२३-०८-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील नगीनाघाट येथील स्मशानभूमीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने पावसाळ्यात तेथे मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या अंत्यविधिसाठी गैरसोय होणार असल्याचे नुकतेच माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मशानभूमीचे काम तात्काळ हाती घेण्यात यावे व निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांविरुध्द कारवाई करण्यात यावी अशी मागणीचे निवेदन शिवसेना अवजड वाहतूक सेनेतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनानुसार स्मशानभूमीचे काम करण्याबाबत व निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०५-२०१७) :** (१) हे अशंतः खरे आहे.

नांदेड जिल्ह्यातील नगीनाघाट येथील स्मशानभूमीचे काम निकृष्ट झालेले नाही, तथापि सदर स्मशानभूमी मधील प्रेत जाळण्यासाठीचे लोखंडी पिंजऱ्याची, गैरप्रवृत्तीच्या लोकांकडून नासधुस झाली आहे. त्यामुळे पावसाळ्यात तेथे मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या अत्यंविधीसाठी गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) स्मशानभुमीच्या कामाचे करारातील अटीनुसार सदरचे लोखंडी पिंजरे बसविण्याचे काम महानगरपालिकेमार्फत कंत्राटदारांकडुन पुर्ण करुन घेण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कराड (जि.सातारा) येथील जलशुध्दी केंद्रात काम करणाऱ्या**
**कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(१६) ६०५७१ (२९-०८-२०१६). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) येथील जलशुध्दी केंद्रात सन १९९३ पासून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे कराड येथील लोकप्रतिनिधींनी दि.२५/५/२०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०४-२०१७) :** (१) व (२) कराड (जि.सातारा) नगरपरिषदेतील जलशुध्दीकरण केंद्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत राज्यमंत्री (नगर विकास) यांच्याकडे दिनांक १८.०५.२०१६ रोजी तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, नगरपरिषद कराड, जि.सातारा यांना जिल्हाधिकारी सातारा तसेच आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेमार्फत सविस्तर प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना शासनाच्या दिनांक १६.७.२०१६ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देवळा नगरपंचयातीमध्ये (जि.नाशिक) पुर्णवेळ अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्याबाबत**

**(१७) ६०६७९ (२६-०८-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवळा ग्रामपंचायतीला (जि.नाशिक) वर्षभरापूर्वी नगरपंचातीचा दर्जा मिळाला असला तरी अद्यापही पुर्णवेळ मुख्याधिकारी, इतर अधिकारी, कर्मचारी, लेखापाल व अभियंत्यांची नेमणूक झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्याधिकारी व इतर अधिकाऱ्यांची नेमणूक झाली नसल्यामुळे नागरिकांची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, देवळा नगरपंचायतीस पूर्णवेळ मुख्याधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) :** (१) दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ च्या आदेशान्वये नियमित मुख्याधिकारी यांची नियुक्त करण्यात आली आहे. राज्यस्तरीय संवर्गातील पदावरील कर्मचारी नेमणूक करण्यात आलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ च्या आदेशान्वये नियमित मुख्याधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दिनांक ०५ जुलै, २०१६ च्या आदेशानुसार देवळा नगरपंचायतीसाठी कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार कर्मचारी नेमणूकीबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

**इचलकरंजी शहरातील भुयारी गटार योजनेचे काम जलदगतीने पुर्ण करणेबाबत**

**(१८) ६१३९७ (२९-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इचलकरंजी हे औद्योगीक शहर असल्यामुळे पंचगंगा नदीचे मोठया प्रमाणात प्रदुषण होत आहे त्यामुळे शहरातील सांडपाणी निर्गत करणेसाठी भुयारी गटार योजनेचे काम जलदगतीने पुर्ण करावे असे आदेश मा. उच्च न्यायालयाने सन २०१२ मध्ये दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाच्या UIDSSMT योजनेअंतर्गत इचलकरंजी शहरातील भुयारी गटार योजनेचे ४० टक्के काम पुर्ण झाले असून उर्वरित काम पुर्ण होण्यासाठी इचलकरंजी नगरपरिषदेने शासनाकडून रु. २० कोटी इतकी रक्कम विशेष अनुदान म्हणुन देण्याची मागणी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे माहे मार्च, २०१६ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०५-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४)

- केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी योजनेअंतर्गत इचलकरंजी शहराच्या भुयारी गटार प्रकल्पासाठी अनुज्ञेय केंद्र व राज्य शासन हिश्याचा सर्व निधी (रु.६६.०८ कोटी) इचलकरंजी नगरपरिषदेस वितरीत केला आहे.
- याव्यवतिरिक्त नागरी स्थानिक स्वराज संस्था हिश्याचा निधी इचलकरंजी नगरपरिषदेने उभारुन प्रकल्पाचे काम तात्काळ पूर्ण करणे अपेक्षित आहे.

---

## अनुसूचित जाती व जमातीच्या नगर सेवक पदांच्या आरक्षणाबाबत

**(१९) ६२६१३ (२९-०८-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नागपूर, नाशिक, पिंपरी चिंचवड, सोलापूर, अमरावती, लातूर, चंद्रपूर व अहमदनगर महानगरपालिका वगळता इतर १९ महानगरपालिकांनी लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जातीसाठी १३ टक्के आरक्षणाप्रमाणे नगर सेवक पदाच्या ३३८ जागा राखीव असताना केवळ २६० जागा राखीव तर अनुसूचित जमातीसाठी ७ टक्के आरक्षणाप्रमाणे १८२ जागा राखीव ठेवणे आवश्यक असतांना केवळ ७० जागावरच आरक्षण ठेवण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ च्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) :** (१) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १९८८ मध्ये कलम ५(ए) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ५(३) मधील तरतूदींच्या आधारे राज्यातील २६ महानगरपालिकांमध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी एकूण २६८ व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ७१ जागा आरक्षित करण्यात आल्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने अहवाल सादर केला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरळी (मुंबई) येथे ३३(७) अंतर्गत ना-हरकत प्रमाणपत्र घेवूनही विकासकांनी पुनर्विकासाची कामे सुरु न केल्याबाबत**

**(२०) ६२७९१ (२९-०८-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरळी (मुंबई) येथील हाजी उस्मान नगर, नवीन नगर या झोपडपट्टयाच्या पुनर्विकासासंदर्भात ३३(७) अंतर्गत ना-हरकत प्रमाणपत्र घेवूनही विकासकांनी पुनर्विकासाची कामे सुरु न केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू झोपडपट्टी पुनर्विकासाची कामे तातडीने मार्गी लावण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२१-०४-२०१७) :** (१) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाद्वारे भूकर पाहणी क्र. २४१ लोअर परेल विभाग, ना.म. जोशी मार्ग येथील उस्मान हाजी गणी चाळ या उपकरप्राप्त इमारतीच्या विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गतच्या पुनर्विकासाकरीता दि.०४.०८.२००८ रोजी ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येऊनही विकासक मे. नवकार कन्स्ट्रक्शन कं. यांच्याकडून पुनर्विकासाचे काम अद्यापपर्यंत सुरु करण्यात आलेले नाही. तर नवीन नगर या उपकरप्राप्त इमारतीचा विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत पुनर्विकास करण्याबाबतचा प्रस्ताव मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडे प्राप्त झालेला नाही.
(२) भूकर पाहणी क्र. २४१ लोअर परेल विभाग येथील उस्मान हाजी गणी चाळ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाची योजना कार्यान्वित होत नसल्याबाबत भाडेकरु / रहिवाशी यांच्याकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या स्तरावरुन विकासक व भाडेकरु / रहिवाशी यांच्यासोबत संयुक्त बैठकांचे आयोजन करुन विकासकास काम लवकरात लवकर चालू करण्याबाबत निर्देश देऊनही तसेच विकासकाने बैठकांमध्ये सदरची योजना चालू करण्याबाबत दिलेल्या आश्वासनाचे पालन केलेले नाही. सबब, विकासकावर बजावण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीशीस विकासक कोणतेही वैद्य कारण देऊ न शकल्यामुळे भाडेकरु/ रहिवाश्यांच्या मागणीच्या अनुषंगाने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाद्वारे दि.२१.१०.२०१६ च्या पत्राद्वारे विकासकास प्रदान करण्यात आलेले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईमध्ये भाडेकरूंच्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाकरिता मॉडेल ॲग्रीमेंट ड्राफ्टची मागणी केल्याबाबत**

**(२१) ६३७०१ (२९-०८-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये भाडेकरूंच्या जुन्या व जर्जर इमारतींच्या पुनर्विकासाकरिता भाडेकरू आणि विकासक यांच्यामध्ये करार करण्यासाठी मॉडेल ॲग्रीमेंट ड्राफ्टची मागणी लोकप्रतीनिधिंनी मा. मुख्यमंत्री यांना माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान समक्ष भेटून निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाबतीत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२४-०४-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) मा.आमदार श्री.मंगलप्रभात लोढा यांनी विकासक व भाडेकरुंच्या प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संस्थेदरम्यान करावयाच्या कराराचा आदर्श करार मसुदा राज्य शासनास सादर केला आहे. जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतीमधील भाडेकरुंच्या पुनर्विकासाबाबतची शासनाची व म्हाडाची जबाबदारी विचारात घेता सदर करारामधील म्हाडाचाही समावेश करणे योग्य राहिल. याबाबत तसेच आदर्श करार मसुद्याबाबत विधी सल्लागार म्हाडा यांचे अभिप्राय घेवून सदर करारामुळे भाडेकरु / रहिवाश्यांचे हित कसे साधले जाईल याच्या कारणमिमांसेहसह प्रस्ताव सादर करण्याबाबत या विभागाच्या दि.९.२.२०१७ च्या पत्राद्वारे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार म्हाडाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शासन मान्यतेने अदर्श करार मसूदा अंतीम करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

### जेएनपीटी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना साडेबारा टक्के भूखंडाचे वितरण करण्याबाबत

**(२२) ६५१७० (१६-०१-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेएनपीटी प्रकल्पग्रस्त (उरण) शेतकऱ्यांना देशाचे दोन वर्षापूर्वी साडेबारा टक्के भूखंड वितरणाचे इरादा पत्रे देण्यात येऊनही शेतकऱ्यांना अद्यापी भूखंड मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या प्रकल्पग्रस्तांनी दिनांक १७ ऑगस्ट, २०१६ रोजी सदर इरादापत्रांची होळी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के भूखंडाचे वितरण अद्यापपर्यंत न होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१७) :** (१), (२) व (३) जेएनपीटी प्रकल्पग्रस्त भूधारकांना १२.५ टक्के जमीन वाटप योजनेचा लाभ देणेबाबत शासन निर्णय क्र.सिआयडी-३२१०/प्र.क्र.४३०/नवि-१०, दि.१४.८.२०१४ चे अनुषंगाने जेएनपीटीकडून लाभार्थींच्या याद्या अधिप्रमाणित करुन डिसेंबर, २०१६ मध्ये प्राप्त झाल्या आहेत. त्यानंतर सिडको महामंडळामार्फत दि.२७.१२.२०१६ रोजी एकूण २५ भूखंड (क्षेत्र ७२२५७ चौ.मी.) आणि दि.१.३.२०१७ रोजी ३५ भूखंड (क्षेत्र ३६५९ चौ.मी.) संगणकीय सोडतीव्दारे इरादित करण्यात आले आहेत. वाटपाची प्रक्रिया सुरु आहे.

---

## सानपाडा सबवेची दुरवस्था झाल्याबाबत

**(२३) ६५२०१ (१६-०१-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सानपाडा परिसरात लोकवस्ती वाढल्यामुळे एपीएमसी मार्केट किंवा वाशीला जाण्यासाठी असलेल्या सबवेची अत्यंत दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सबवे दुरुस्त करण्याबाबत नागरिकांनी मागणी करूनही सिडको त्याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार सदर सबवे दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१७) :** (१), (२), (३), (४) व (५) सन १९९३ मध्ये सिडकोने सानपाडा रेल्वे स्थानक संकुलाची निर्मिती केली असून सानपाडा रेल्वे स्थानक संकुलात पादचारी भुयारी मार्ग आणि सानपाडा नोडकडून सायन-पनवेल हायवेकडे ये-जा करण्याकरिता वाहनांसाठी भुयारी मार्ग आहेत. सिडकोमार्फत सदर भुयारी मार्गांची नियमितपणे दुरुस्ती व देखरेख करण्यात येते. या भुयारी मार्गाबाबत सिडकोकडे तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

---

## वांद्रे (मुंबई) येथील स्वामी विवेकानंद तलावातील प्रदूषणाबाबत

**(२४) ६५२८१ (१६-०१-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), डॉ.राहूल आहेर (चांदवड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथील एस.व्ही. मार्गावरील स्वामी विवेकानंद तलाव प्रसिध्द असून पर्यटक व स्थानिक नागरिक येथे मोठ्या प्रमाणात येत असल्याने या तलावाच्या सुशोभिकरणासाठी ४ कोटी खर्च करण्यात आला परंतु संबंधित व्यवस्थापनाने तलावाकडे दुर्लक्ष केल्याने प्लॅस्टिकच्या वस्तू, कचरा, निर्माल्यामुळे तलाव प्रदूषित झाल्याचे दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलावाचे प्रदूषण रोखण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१७)** : (१) सदर तलाव हा तिन्ही बाजूंनी मोकळा असल्यामुळे तलावाच्या शेजारी राहणारे स्थानिक लोक व कचरा वेचणाऱ्या काही व्यक्ती सदर तलावात रिकाम्या बाटल्या व तत्सम वस्तु फेकत असतात.

तथापि, सदर तलावात टाकण्यात येणारा तरंगता कचरा हा वेळोवेळी सदर तलावाच्या परिरक्षण कंत्राटदारामार्फत काढण्यात येतो.

(२) सदर तलावाचे प्रदुषण रोखण्याबाबत महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

• सदर ठिकाणी ४ सुरक्षा रक्षक नेमण्यात आले आहेत.

• तलावाच्या आवारात ६ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

• तलावात “कचरा टाकू नये” असे सुचना फलक तलावाच्या परिसरात लावण्याचे व तलावात कचरा, रिकाम्या बाटल्या व तत्सम वस्तु टाकल्यास सदर व्यक्तीवर दंडात्मक कारवाई करण्याचे प्रस्ताविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर महानगरपालिकेत सफाई कामगारांचा नियुक्तीतील गैरव्यवहार**

**(२५) ६५५६९ (१६-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या प्रशासन अधिकाऱ्यांनी लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांच्या नियुक्त्यांमध्ये अवैध कागदपत्रे सादर करून नोकरीमध्ये सामावून घेतले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांचा मृत्यू झाल्यास वारसाला नोकरी मिळणे अपेक्षित असताना अशा वारसदारांना नोकरी न देता ईतरांना नोकरी देऊन गैरव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक सफाई कामगारांच्या नियुक्तीच्या धारीका जाणीवपूर्वक गहाळ करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०१७)** : (१) असे केवळ एक प्रकरण आढळले असून, खरी बाब लक्षात येताच संबंधीत कर्मचा-यास बडतर्फ करण्यात येऊन फौजदारी तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

नमूद प्रकरणात ज्या सफाई कर्मचाऱ्यांच्या नावे आवेदन करण्यात आले होते, ती व्यक्ती अस्तित्वात नसल्याने व खोट्या वारसदाराने खोटी व बनावट कागदपत्रे सादर केल्याने

नियमानुसार बडतर्फ करुन त्यांचे विरुध्द नागपूर महापालिकेकडून फौजदारी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) जाणीवपूर्वक संचिका गहाळ केल्या, हे खरे नाही.

सफाई कामगाराच्या नियुक्ती संबंधीच्या सुमारे २५०० पैकी केवळ ३ धारिका गहाळ असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. या धारीका सन १९७५ ते १९९५ ह्या दरम्यान सेवानिवृत्त / मृत झालेल्या सफाई कर्मचा-यांच्या वारसांच्या झालेल्या नियुक्ती संबंधीच्या आहेत. सदर प्रकरणी चौकशी करुन दोषी कर्मचा-यांच्या विरुध्द एफ.आय.आर. दाखल करण्याबाबत संबंधीत पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. असे आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

---

**नागपूर शहरातील भोसलेकालीन वास्तुकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याबाबत**

**(२६) ६५६२९ (१६-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील विविध भागांमध्ये भोसलेकालीन वास्तूच्या देखभालीकडे महानगरपालिका प्रशासन व शासनाकडून दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने भोसलेकालीन वास्तूंचा देखभालीकरीता शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर वास्तूंचा देखभालीकरिता शासनाने निधी उपलब्ध केला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०१७) :** (१), (२), (३) व (४) नागपूर शहरातील विविध भागांमध्ये भोसलेकालीन सर्व प्रकारच्या पुरातन वास्तूबाबतची संपूर्ण अद्ययावत माहिती नागपूर महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही. तथापि, शासन अधिसूचनेनुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत येणा-या हेरिटेज वास्तू मध्ये एकूण १५५ वास्तू व जागांचा समावेश असून, यात महानगरपालिकेच्या मालकीच्या ०३ व राज्य शासन व इतर विभाग यांच्या संयुक्त मालकीच्या ०३ जागा विनिर्दिष्ट आहेत.

उर्वरित १४९ स्थळांपैकी १६ जागा ह्या भोसले देवस्थान ट्रस्ट, भोसले कोर्ट ऑफ वॉर्डस, भोसले वेदशाळा खाजगी जागा, भोसले परिवार इ. च्या मालकीच्या दर्शविल्या असून, शिल्लक सर्व १३२ जागा किंवा वास्तू ह्या खाजगी ट्रस्ट, विविध शासकीय / निमशासकीय संस्था तसेच खाजगी मालकीच्या आहेत. ह्या संपूर्ण मालमत्तांच्या संवर्धनाची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी संबंधीत मालकाची आहे. असे आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

सदर विविध भोसलेकालीन वास्तूपैकी एकही वास्तू राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेली नसल्याने त्यांची देखभाल शासनाकडून करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांबाबत

**(२७) ६६२५१ (१६-०१-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देणे व त्यांच्या समस्यांवर निर्णय घेण्यासाठी गिरणी कामगार संघटना व मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचेसमवेत मंत्रालयातील दालनामध्ये दिनांक १८ आक्टोबर, २०१६ रोजी बैठक घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी गिरणी कामगारांच्या समस्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व तसेच गिरणी कामगारांच्या मागण्यांवर निर्णय घेण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :** (१) ते (३) दिनांक १८.१०.२०१६ रोजी अशा औपचारिक बैठकीचे आयोजन करण्यात आलेले नव्हते. गिरणी कामगारांना मुंबई महानगर प्रदेशामध्ये घरे उपलब्ध करुन देणेच्या कार्यपध्दती संदर्भात मा.मुख्य सचिव यांचेकडे दिनांक २.३.२०१६ रोजी यापूर्वी बैठक पार पडलेली आहे. त्यामध्ये गिरणी कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बांधलेल्या व वितरणासाठी उपलब्ध असलेल्या सदनिका गिरणी कामगारांना वितरण करणेचा मुद्दा होता. यासंदर्भात गिरणी कामगारांना वितरीत करणेत यावयाच्या सदनिकेची किंमत रु. ६.०० लक्ष शासनाकडून निश्चित करणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे सदर सदनिकांची सोडत म्हाडाकडून काढणेत आलेली आहे.

---

## कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपलिका क्षेत्रातील जाहिरात फलकाबाबत

**(२८) ६६५५० (१६-०१-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगरपालिका क्षेत्रातील जाहिरात फलक लावणाऱ्या कंपनींची मुदत एक ते दीड वर्षापूर्वी संपलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपालिकेने जाहिरात फलक लावण्याची निविदा राबविणे आवश्यक असताना तीन राबविल्यामुळे नगरपालिका अधिकारी अनधिकृत होर्डिंग्जला पाठीशी घालत असून नगरपालिकेचे आर्थिक नुकसान करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले, तद्नुसार नगरपालिकेचे नुकसान करणाऱ्या व जाहिरात फलक लावण्यास मुभा देणाऱ्या नगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०४-२०१७) :** (१) व (२) कुळगाव बदलापूर नगरपरिषदेने सन २०१०-२०१५ या पाच वर्षाकरीता जाहिरात कंत्राट देण्यात आले होते. सदर कंत्राटाची मुदत दि.०३/०४/२०१५ रोजी संपली.

दरम्यानच्या कालावधीमध्ये निवडणूक आचार संहिता चालू झाल्याने निविदा प्रक्रिया चालू करण्यात आली नाही.

तद्नंतर पुढील तीन वर्षासाठी वाढीव दराने दि. ०५/११/२०१५ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली. परंतू पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने तसेच विविध तांत्रिक बाबींमूळे एकुण पाच वेळा निविदा मागविण्यात येऊन पाचव्यांदा मे. इमेज ॲर्व्हटायझिंग व मार्केटिंग या संस्थेची निविदा नगरपरिषदेने तरतूद केलेल्या किंमतीपेक्षा जास्त असल्याने नगरपरिषदेने मंजूरी देऊन त्यास कामाचे आदेशही देण्यात आले आहेत.

सन २०१६-१७ ते २०१८-१९ या तीन वर्षाकरीता एकुण रु. ३.४९ कोटी रक्कमेचा ठेका देण्यात आला आहे. सन २०१५-१६(ठेका न दिलेला कालावधी) मध्ये कुळगाव बदलापूर नगरपरिषदेमार्फत होर्डिग्ज करीता जाहिरात परवानगी दिलेली होती. जाहिरात कर शुल्काच्या रुपात रु. ५.४० लक्ष इतक्या रक्कमेची वसूली करण्यात आलेली आहे त्यामुळे नगरपालिकेचे नुकसान झालेले नाही.

(३) व (४) या प्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे यांना चौकशी करुन त्यामध्ये तथ्य आढळल्यास संबंधिताविरुध्द नियमानुसार उचित कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

---

**वाशिम नगरपरिषदेकडुन बेकायदेशीरित्या घरकूल योजनेचे अर्ज भरुन घेतले जात असल्याबाबत**

**(२९) ६६६२३ (१६-०१-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम नगरपरिषदेकडून (जि.वाशिम) कुठलीही वर्क ऑर्डर नसताना व कोणत्याही शासकीय यंत्रणेची परवानगी नसताना वाशिम शहरात दोन वेगवेगळया ठिकाणी बेकायदेशीरित्या घरकूल योजनेचे अर्ज भरुन घेतले जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०१७) :** (१) अशी बाब वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती.

(२) वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीनुसार नगरपरिषदेमार्फत पडताळणी केली असता, नगरपरिषदेकडे कोणांही नागरिकाची अशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झाली नसल्याचे दिसून आले. तथापी, अशी बाब घडु नये यासाठी स्थानिक वृत्तपत्रातुन नागरिकांमध्ये नगरपरिषदेमार्फत जनजागृती करण्यात आली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरात जैववैविध्य उद्यानाचे आरक्षण (बीडीपी) असलेल्या भूखंडावरील अनधिकृत बांधकामांबाबत

**(३०) ६७३३८ (१६-०१-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात जैववैविध्य उद्यानाचे आरक्षण (बीडीपी) असलेल्या भूखंडावरील अनधिकृत बांधकामांकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१६ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिका प्रशासनाकडून जैववैविध्य उद्यानाचे आरक्षण (बीडीपी) असलेल्या भूखंडावरील अनधिकृत बांधकामांवर कारवाई होत नसल्याने बांधकामात वाढ होत चालली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०५-२०१७) :** (१), (२) व (३) पुणे महानगरपालिकेमध्ये नविन समाविष्ठ झालेल्या गांवामधील जैववैविध्य आक्षणाच्या जागेमध्ये अनधिकृत बांधकामे होत आहेत, ही बाब काही अंशी खरे आहे. तथापि, सदर अनधिकृत बांधकामाबाबत पदनिर्देशित अधिका-यांमार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येत असून सदरची बहुतांशी अनधिकृत बांधकामे पाडण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत

**(३१) ६७३८९ (१६-०१-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील आधारवाडी डम्पिंग ग्राउंड बंद करण्यासाठी नेमण्यात आलेल्या ठेकेदाराने काम बंद केल्यामुळे शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता बारावे आणि मंद येथील शास्त्रोक्त पद्धतीच्या घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया केंद्राला स्थानिकांनी विरोध केल्याने सदर प्रकल्प बंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण - डोंबिवली महापालिका हद्दीतील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत महापालिका प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही,
(३) व (४) घनकचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लागण्याकरीता महानगरपालिकेकडून नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २०१६ नुसार पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-
• शहरातील कचऱ्याचे सुका व ओला कचरा असे वर्गीकरण करणे बंधनकारक करण्यात आले आहे.
• कचरा वेचणा-या कामगारांच्या स्वयंसेवी संघटनांची प्रभागनिहाय नेमणूक करण्यात आली असून त्यांच्याकडून जनजागृती व सर्वेक्षणाच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे.
• नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी महानगरपालिकेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल (१) तयार करण्यात आला. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेमध्ये सहभागी होऊन वाहतूक व संकलन व्यवस्था अद्ययावत करण्यात आली. आवश्यक यांत्रिकी वाहने घेण्यात आली.
• महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे महानगरपालिकेचा (सन २०१५-२०३५) या कालावधीसाठी घनकचरा व्यवस्थापनाचा कृती आराखडा सादर केला.
• घनकचऱ्यावर प्रक्रिया व विल्हेवाट लागण्यासाठी महानगरपालिकेने सविस्तर प्रकल्प अहवाल (२) तयार करुन त्यास स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत मार्च, २०१६ मध्ये मान्यता घेण्यात आली.
• या अभियानांतर्गत मौजे उंबर्डे, बारावे व मांडा येथे एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प (कंपोस्टींग) व शास्त्रोक्त भरावभूमी बांधण्याच्या कामाचा समावेश आहे. सद्यस्थितीत या प्रकल्पांच्या निविदा महानगरपालिकेच्या स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात आल्या आहेत.
• महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा ठराव क्र.७५, दि.२०/०८/२०१५ नुसार एकूण १३ ठिकाणी बायोगॅस प्रकल्प उभारण्यास मान्यता मिळाली आहे. त्यापैकी मौजे उंबर्डे व मौजे आयरे येथील कामे सुरु आहेत.

आधारवाडी येथील क्षेपणभूमी शास्त्रोक्त पद्धतीने बंद करण्याच्या कामाची निविदा स्विकृत करण्यात आली असून महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे.

---

## नागपूर सुधार प्रन्यासच्या गैरकारभाराबाबत

**(३२) ६७५५२ (०७-०२-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर (पूर्व) लगतच्या भागात नागरी सुविधांचा अभाव असल्याने नागरिक त्रस्त असून वारंवार तक्रारी करुनही प्रशासनाने दखल न घेतल्यामुळे दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी नागपूर सुधार प्रन्यास कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पूर्व नागपूरात रस्त्यांची अवस्था बिकट असून पावसाचे पाणी वाहून जाण्याची व्यवस्था नसल्याने पावसाचे पाणी रस्त्यावर व वस्त्यांमध्ये साचते त्यामुळे या भागात सी-वेज

लाईन व पावसाळी नाला टाकण्याची आवश्यकता असताना नागपूर सुधार प्रन्यासने त्याकडे दुर्लक्ष केले असून विकास शुल्कात वाढ केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
दिनांक १०/८/२०१६ रोजी असा मोर्चा नागपूर सुधार प्रन्यासच्या मुख्य कार्यालयावर आला होता.
(२), (३) व (४) पूर्व नागपूरात एकूण ६५७ अनधिकृत अभिन्यास असून, त्यापैकी ३२२ अभिन्यास मंजूर झाले आहेत. त्यामध्ये रु.८४.४८ कोटी निधी प्राप्त झाला आहे. हा निधी व इतर निधी मिळून एकूण रु.११०.१६ कोटी इतका निधी या भागात विविध विकासावर खर्च झाला आहे. यामध्ये रस्ते, पावसाळी पाण्याच्या वाहीका, मलवाहीका, पिण्याच्या पाण्याच्या वाहीका, यांचा समावेश आहे.

याशिवाय अधिकृत व अनधिकृत अभिन्यासामध्ये प्रत्येकी रु.१००.०० कोटी इतका निधी नागपूर सुधार प्रन्यासच्या निधीतून खर्च करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार पूर्व नागपूरात मंजूर अभिन्यासात रु.२०.०० कोटी व नामंजूर अभिन्यासात रु.२०.०० कोटीची कामे मंजूर झाली असून, ही कामे प्रगतीपथावर आहेत.

या अनधिकृत वस्त्यामध्ये विकास कामे पूर्ण करण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यासद्वारे रु.११२/- प्रती चौ.फू. प्रमाणे मागणीपत्र देण्यात येत होते. परंतु दिनांक २८/०९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये सदरचा दर रु.५६/- प्रती चौ.फू. इतका करण्यात आलेला आहे.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या क्षेत्रातील अनधिकृत पाणी जोडणी व बांधकामाबाबत**

**(३३) ६७६३२ (१६-०१-२०१७). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या क्षेत्रातील विशेषत: डोंबिवली पश्चिमेकडील “ह” प्रभाग क्षेत्र येथील अनधिकृत बांधकामे, अनधिकृत पाणी जोडणी याबाबत तेथील महिला नागरिकांनी जिल्हाधिकारी ठाणे, आयुक्त कोकण विभाग यांचेकडे दिनांक ४ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास तसेच प्रभाग क्षेत्र अधिकारी डोंबिवली यांचेकडे सहा वेळा लेखी तक्रार करुनही त्याची दखल घेण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगर रचनाकार कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडे दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी न्यू देवकी निवास, तीन दुकानाचे गाळे व रस्त्यांवरील भितींच्या संदर्भात तसेच अनधिकृत नळजोडणीबाबत उपअभियंता पाणी पुरवठा विभाग महानगरपालिका यांचेकडे दिनांक २५ एप्रिल, २०१६ रोजी लेखी तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०४-२०१७) :** (१) हे खरे नाही,

कल्याण-डौंबिवली महानगरपालिकेस या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारींची दखल महानगरपालिकेकडून घेण्यात आली आहे.

(२) या संबंधात महानगरपालिकेचे "ह" प्रभाग क्षेत्र अधिकारी, उप अभियंता (पाणी पुरवठा) यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली होती.

(३) महानगरपालिकेचे "प्रभाग क्षेत्र अधिकारी" तथा "पद निर्देशित अधिकारी" यांनी सदर मिळकतीमधील व्यावसायिक गाळ्यांवर कारवाई केली आहे.

तर महानगरपालिकेच्या उप अभियंता (पाणी पुरवठा) यांच्याकडून नळ जोडण्या खंडीत करण्याची कारवाई करण्यात आली असल्याचे आयुक्त, कल्याण-डौंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव महानगरपालीकेतील वॉर्ड नं. ३८ येथील विकास कामांबाबत**

**(३४) ६७७९४ (१६-०१-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव महानगरपालीकेने वॉर्ड नं. ३८ या वॉर्डातील विविध विकास कामांची दिनांक १४ मार्च, २०१६ रोजी निविदा काढली होती परंतु सदर निविदेनुसार विकास कामे न करताच त्यांची देयके अदा करण्यात आली असून त्यामुळे महापालिकेचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन पालिकेचे झालेले नुकसान संबंधितांकडून वसूल करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१७) :** (१) मालेगाव महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.३८ मधील विविध विकास कामांसाठी महानगरपालिकेमार्फत दिनांक १४ मार्च, २०१६ रोजी निविदा मागविली होती हे खरे आहे.

तथापि, कार्यादेशाप्रमाणे झालेल्या कामांची देयके अदा करण्यात आलेली असून, विकास कामे न करताच देयके अदा करण्यात आली आहे, ही बाब खरी नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती शहरातील मोकाट श्वानांची संख्या वाढल्याबाबत

**(३५) ६७९३४ (१६-०१-२०१७). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरातील मुख्य रस्त्यांसह गल्लीमध्ये मोकाट श्वानांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असून श्वानदंशाच्या घटनांमध्ये सुध्दा वाढ झाली असल्याचे माहे जुलै, २०१६, दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोकाट श्वानाची संख्या आटोक्यात यावी यासाठी त्यांची निर्बीजीकरण शस्त्रक्रिया करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०१७) :** (१) अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती व महापालिका आरोग्य विभाग यांचेकडून प्राप्त माहितीनुसार माहे जुलै, २०१६ या कालावधीत एकूण ४०३ लोकांना भटके श्वान चावले असल्याची नोंद झाली आहे.

(२) व (३) अमरावती महापालिकेने अॅनिमल बर्थ कंट्रोल (डॉग्ज) रुल्स २००१ नुसार श्वान उत्पत्ती नियंत्रण उपक्रमाची कार्यवाही युध्द स्तरावर सुरु केली आहे. त्यानुसार सन २०१५-१६ मध्ये ५३८४ मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण तथा अॅन्टी रॅबिजचे लसिकरण पूर्ण करण्यात आलेले असून, यासाठी महापालिकेने या कालावधीत रु.४०.२१ लक्ष इतका खर्च केलेला आहे.

तसेच कुत्रे चावले असता, जखमींना उपचारासाठी शासकीय रुग्णालय व महापालिका रुग्णालयात ए.आर.व्ही.पी.लस पुरेशा प्रमाणात उपलब्ध केलेली आहे.

---

### वाशिम जिल्ह्यातील मालेगाव नगरपंचायतीमध्ये कर्मचाऱ्यांचे समायोजन झाले नसल्याबाबत

**(३६) ६८१५२ (१६-०१-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील मालेगाव येथे ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायतीमध्ये झाले असुन कर्मचाऱ्यांचे समायोजन नगरपंचायतीमध्ये झाले नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समायोजन करण्यात यावे तसेच नगर पंचायत कर्मचारी म्हणून वेतन मिळावे अशी मागणी कर्मचाऱ्यांनी मा.पालकमंत्र्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीवर शासनाने निर्णय घेवून सदर कर्मचाऱ्यांचे समायोजन व पंचायत कर्मचारी म्हणून वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०४-२०१७) :** (१) होय.

(२) होय.

(३) राज्यातील तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या नगरपरिषद / नगरपंचायतीच्या आस्थापनेवरील पदावर समावेशन करण्याचे अधिकार संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी विभागीय आयुक्त यांना प्रदान केले असून त्यानूसार जिल्हाधिकारी, वाशिम यांनी दिनांक ३०.०३.२०१७ अन्वये विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालनालय, अमरावती यांना प्रस्ताव सादर केला आहे. त्यानूसार कर्मचारी समावेशन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**मोहपा नगरपरिषदेच्या (जि.नागपूर) मुख्याधिकाऱ्यांच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(३७) ६८३१० (१६-०१-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहपा नगरपरिषदेचे (जि.नागपूर) मुख्याधिकारी यांच्या विरोधात लोकप्रतिनिधी आणि नगराध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी नागपूर यांच्याकडे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनासह प्रत्यक्ष भेटून तक्रार केल्यांनतरही मुख्याधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिंनाक २३ ऑक्टोंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करुन संबधित अधिकाऱ्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०४-२०१७) :** (१), (२) व (३) दिनांक ०६.०४.२०१७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, नागपूर यांना मुख्याधिकारी, नगरपरिषद मोहपा, जिल्हा नागपूर यांच्या विरोधात केलेल्या तक्रारीबाबत चौकशी करुन उचित कार्यवाही करणेबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

**अचलपूर शहरासह तालुक्यातील आठवडी बाजारातील होत असलेली अवैध मांसविक्री**

**(३८) ६८३२७ (१६-१२-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि. अमरावती) शहरासह तालुक्यातील बहुतांश आठवडी बाजारात प्राण्यांची वैद्यकीय तपासणी न करता उघडयावर मांस विक्री होत असल्याने ते खाणाऱ्यांना दुर्धर आजारांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन तेथील अवैध मांसविक्री थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०१७) :** (१) अचलपूर नगरपरिषदेकडून प्राप्त अहवालानुसार अचलपूर शहरातील आठवडी बाजारामध्ये उघड्यावर मांस विक्री होत नाही, त्यामुळे दुर्धर आजारांना सामोरे जावे लागल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महापालिकेतील पाणी टँकर गैरव्यवहार**

**(३९) ६९२४७ (१६-०१-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या एन वॉर्डमधील काही सोसायटयांमध्ये पाणी साठविण्याची पर्यायी व्यवस्था नसतानाही पालिकेकडून संबंधितांना दररोज टँकरने हजारो लिटर पाणी पुरविण्यात आले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही सोसायटयांना जलवाहिनीतून नियमित पाणीपुरवठा होत असतानाही त्या सोसायटयांना टँकरव्दारे पाणीपूरवठा करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पाणी गैरव्यवहार प्रकरणी संबंधित अधिकारी व पाणी माफीयांवर कारवाई करुन खर्च वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये ज्या सोसायटयांना खाजगी टँकरकडून पाणी पुरवठा करण्यात आला त्या सर्व सोसायट्यांच्या आवारातील भूमिगत शोषण टाक्यांमध्ये पाणी साठविण्याची व्यवस्था आहे.

(२) हे खरे नाही.

महानगरपालिकेच्या “एन” विभागातील काही सोसायट्यांमध्ये पाणी पुरवठा व्यवस्थेतील तांत्रिक अडचणीमुळे कमी पाणी पुरवठा झालेल्या ठिकाणी रहिवाशांच्या पाण्याच्या आवश्यकतेचा विचार करुन टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) येथील सिडको हद्दीतील अनधिकृत बांधकामांबाबत**

**(४०) ६९२७० (१६-०१-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथील सिडको हद्दीतील अनधिकृत बांधकामांना पैसे घेऊन सहकार्य करणाऱ्या सिडको अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी बांधकाम व्यवसायिकांनी पनवेल महानगरपालिकेकडे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार शासनाने संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१७) :** (१) नाही.

(२) दि. १.१०.२०१६ रोजी पनवेल महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली असून त्या विभागाकरीता नियोजन प्राधिकरण म्हणून महानगरपालिकेची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्या विभागातील अतिक्रमित/अनधिकृत बांधकामे निष्काशित करण्याचे महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम, १९६६ चे सिडको महामंडळाचे अधिकार संपुष्टात आले आहेत. तसेच, पनवेल येथील सिडको हद्दीतील अनधिकृत बांधकामांना पैसे घेऊन सहकार्य करणाऱ्या सिडको अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याच्या मागणीबाबत तक्रार प्राप्त नसल्याने चौकशी करण्यात आलेली नाही.

(३) निरंक

---

**उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील ८५५ अनधिकृत बांधकामांबाबत**

**(४१) ६९६२९ (२३-०१-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील ८५५ अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्याबाबतचा निर्णय मा. उच्च न्यायालयाने सन २००३ साली दिल्यानंतर सदरच्या बांधकामांवर दंडात्मक कारवाई करुन नियमित करण्याचे शिथिल धोरण स्वीकारले तथापि सन २००५ नंतर उल्लेखित ठिकाणांवर एकही नवीन बांधकाम न करण्याचा आदेश धाब्यावर बसवून शेकडो बांधकामे उभारण्यात आल्याची बाब दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली वा येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनस्तरावर कोणती तातडीची कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :** (१), (२) व (३) मा.उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक १०५/२००३ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील ८५५ अनधिकृत बांधकामे नियमाधीन करण्याबाबतचा निर्णय दिला होता.

या अनुषंगाने सन २००६ मध्ये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे नियमाधीन करण्याबाबतचा अध्यादेश पारित करण्यात आला आहे. त्यानुसार सदर अनधिकृत बांधकामे नियमाधीन करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर सुरु आहे.

तसेच, उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत आढळून आलेली अनधिकृत बांधकामे वेळोवेळी महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात येतात.

---

**कल्याण आंबिवली परिसरातील एन.आर.सी. कंपनीबाबत**

**(४२) ६९६३४ (१६-०१-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण आंबिवली परिसरातील एन.आर.सी. कंपनी ब-याच कालावधीपासून बंद केलेली असून सदर कंपनीकडे हजारो कामगारांची देणी थकीत असताना संबंधित कंपनीचे वरिष्ठ अधिकारी संगनमत करुन लाखो रुपयांचे भंगार विक्री करीत असल्याची बाब परिसरातील नागरीकांच्या निदर्शनास आली असल्याने नागरीकांच्या मनात संपाताची भावना निर्माण झाल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एन.आर.सी.कंपनीतील कामगारांची थकीत देणी तातडीने देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे तसेच उक्त कंपनीतील भंगार चोरीबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (३१-०५-२०१७) :** (१) मे. एन.आर.सी कंपनीने दिनांक १५/११/२००९ पासून आस्थापनेत टाळेबंदी लागू केलेली असून कंपनी सद्यस्थितीत बंद अवस्थेत आहे. तसेच कामगारांच्या थकीत देण्यासंदर्भातील वाद बीआयएफआर कडे प्रलंबित आहे.

दरम्यान कंपनीतील भंगार, तांबे, शिसे इत्यादी ट्रकमध्ये भरुन त्याची चोरी होत असल्याची तक्रार श्रीमती फरिदा रफिक पठाण या कामगार पत्नीने खडकापाडा पोलीस ठाणे कल्याण (प) येथे दाखल केली आहे. सदर तक्रारीस अनुसरुन कंपनीतील एम.जी.शेख व ट्रक चालक यांचे विरुध्द खडकपाडा पोलीस ठाणे, येथे गु.र.न.३१७/२०१६ अन्वये भा.द.वि.कलम ३७९, ३४ प्रमाणे दिनांक ३०/९/२०१६ रोजी गुन्हा दाखल केला आहे.सदर गुन्हयाविरोधात कारखाना व्यवस्थापनाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सिव्हील रिट पिटीशन अर्ज क्रमांक ३७३९/२०१६ दाखल केला आहे. त्यावर मा.उच्च न्यायालयाने दि. २५/१०/२०१६ रोजी अंतरिम आदेश देवून सदरहू नोंद केलेला एफआयआर बेकायदेशिर असल्याचे नमुद केले असून प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

(२) कामगारांची थकीत देणी देण्याबाबतचा वाद बीआयएफआर यांचेकडे प्रलंबित असून त्यांनी सदरहू कंपनी आजारी म्हणून घोषित केली आहे. कंपनीच्या मालमत्तेची विल्हेवाट बीआयएफआर च्या संमतीशिवाय करु नये, असे आदेश बीआयएफआर ने दिनांक १६/७/२००९ रोजी दिले आहेत. बीआयएफआर समोरील प्रकरण लवकर निकाली निघावे व कामगारांची थकीत देणी मिळण्या संदर्भात बीआयएफआर यांना आदेशित करावे, अशी विनंती याचिका क्रमांक ७५२२/२०१४ ही एनआरसी मजदूर संघ यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केली असून सदर प्रकरणी पुढील सुनावणी करीता प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

दरम्यान केंद्र शासनाने बीआयएफआर व एएआयएफआर रद्द करण्याची तरतुद असलेला The Sick Industrial Companies Repeal Act, २००३ अंमलात आणला असून त्यानुषंगाने अर्थ मंत्रालयाने दिनांक १/१२/२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये सदरहू कायदयाची अंमलबजावणी सुरु केली आहे. त्यामुळे बीआयएफआर च्या समोर सुरु असलेल्या प्रस्तुत प्रकरणाच्या सद्यस्थितीविषयी कामगार आयुक्तांमार्फत दिनांक ३१/१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कंपनी व्यवस्थापनास विचारणा केलेली आहे.

तसेच शासनस्तरावर दिनांक २८/३/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या निदेशांनुसार कंपनी मालमत्ता व भंगार चोरी रोखण्याची उपाययोजना करण्याबाबत कामगार आयुक्त यांचे मार्फत दिनांक १/४/२०१६ रोजीच्या पत्रान्वये पोलीस आयुक्त, ठाणे यांना कळविण्यात आले असून कंपनी परिसरात बीट मार्शल क्रमांक-१ तपास पथक व इतर पेट्रोलिंग गस्तीवर असल्याचे पोलीसांमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये समाविष्ट केलेल्या २७ गावातील शाळांबाबत**

**(४३) ६९६३५ (१६-०१-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमधून दिनांक १२ जुलै, २००२ रोजी २७ गावे वगळण्यात येऊन सदर गावांचा कारभार एम.एम.आर.डी.ए.मार्फत चालविला जात असताना पुनश्च दिनांक १ जून, २०१५ पासून सदर गावे महापालिकेत समाविष्ट करण्याबाबतची अधिसूचना शासनाने जारी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर २७ गावातील २८ शाळा जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखाली येत असल्याने इच्छा असतानाही उक्त २७ गावातील गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाचा अधिकार कायद्यान्वये प्राथमिक सोयीसुविधा महापालिकेला देता येत नसल्याचे दिनांक १६ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, असल्यास, कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) व (३) सदर २७ गावांतील २८ शाळांचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे अद्याप समावेशन करण्यात आलेले नाही.

या शाळा सद्यस्थितीत जिल्हापरिषद, ठाणे यांच्या अखत्यारीत येत असून या शाळांना त्यांच्याकडून शिक्षणाचा अधिकार अधिनियमांतर्गत प्राथमिक सोयीसुविधा पुरविण्यात येत असल्याचे, आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुण्यातील डंम्पिग ग्राऊंडच्या समस्येबाबत

**(४४) ७०१६५ (१६-०१-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील कचरा व्यवस्थापन प्रक्रियेची समस्या दिवसेंदिवस अधिक कठीण होत असून याबाबत पुण्यातील नागरिकांमध्ये असंतोष पसरला असुन कचरा व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्प पुणे शहराच्या हद्दीबाहेर करण्याच्या दृष्टीने तेथील नागरिकांची मागणी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुण्यातील डंम्पिग ग्राऊंडचा प्रश्न रहिवाशांच्या मागणीनंतरही सोडविला जात नसल्याने व जागोजागी कच-याचे ढीग पसरले असल्याने आरोग्याची समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त समस्या सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०५-२०१७) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

पुण्यातील डंपींग ग्राऊंडचा प्रश्न सोडविण्याबाबत पुणे महानगरपालिकेकडून वेळो वेळी प्रयत्न करण्यात येत असून, कचरा प्रक्रिया केंद्रांची क्षमता वाढविणे, जागा उपलब्ध करुन घेणे,अधिकाधिक कच-यावर प्रक्रिया करण्याबाबत सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

विकेंद्रित पध्दतीने पुणे शहरात विविध ठिकाणी कच-यांवर प्रक्रिया केली जात असून, पुण्यातील ८५६ मे. टन कच-यावर प्रक्रिया केली जाते. आरोग्याचा प्रश्न उद्भवणार नाही याकरीता पुणे महानगरपालिकोकडून अधिकाधिक प्रयत्न करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजगुरुनगर नगरपरिषदेचा विकास आराखडा तयार करण्याबाबत

**(४५) ७१२२४ (१६-०१-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजगुरुनगर (ता.खेड, जि.पुणे) या नगरपरिषदेचा विकास आराखडा अद्याप तयार करण्यात न आल्याने नगरपरिषद हद्दीतील जमिनी बिगरशेती करताना ३०% रक्कम बांधकाम व्यावसायिकांकडून घेण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राजगुरुनगर नगरपरिषदेचा विकास आराखडा तयार न करण्याची कारणे काय आहेत तसेच विकास आराखडा तयार करून कार्यालय मंजुरीसाठी किती कालावधी लागणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :** (१) राजगुरूनगर ही नव्याने गठीत झालेली नगरपरिषद असून तिच्या हद्दीचा विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावली महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिध्द झालेली नसल्याने, त्या क्षेत्रास पुणे प्रदेशाच्या मंजूर प्रादेशिक योजनेतील तरतूदी/प्रस्ताव लागू आहेत. त्यानुसार गावठाणांपासूनच्या विवक्षित अंतरामधील शेती विभागातील जमिनींमध्ये रहिवास व इतर अनुषंगीक वापर अनुज्ञेय करण्यासाठी, संबधित जमिनीसाठी बाजार मूल्य दर तक्त्यामध्ये विहित केलेल्या दराच्या ३०% एवढे अधिमूल्य आकारण्याविषयी तरतूद आहे. मात्र, नव्याने गठीत नगरपरिषद हद्दीतील जमिनींसाठी हा दर ५% एवढा कमी करण्याचा तत्वत: निर्णय शासनाने घेतलेला असून त्याबाबतची सूचना दि. १५/०३/२०१७ रोजी प्रसिध्द केली आहे. त्यावर शासनाचा कलम २०(४) खालील अंतिम निर्णय अद्याप होणेचा आहे.
(२) राजगुरूनगर नगरपरिषदेचा विकास आराखडा तयार करणेच काम सुरू असून, त्याकरीता नियुक्त नगर रचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे यांनी तयार केलेल्या प्रस्तावित जमिन वापर नकाशाची प्रसिध्दपुर्व छाननी झाली असून, सदरची प्रारूप विकास योजना नगरपरिषदेकडे हस्तांतरीत करून अधिनियमातील तरतूदींनुसार विहित मुदतीत जनतेच्या हरकती/सूचनांसाठी प्रसिध्द करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे येथील छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयाबाबत**

**(४६) ७१४७८ (१६-०४-२०१७). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयात मागील ३ वर्षात ऑपरेशन थिएटर निर्मिती व उपकरणे खरेदी करण्यामध्ये करोडो रूपयांचा गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रूग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रूग्णांना अनेक असुविधांचा सामना करावा लागत असुन रूग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांबाबतही असंख्य तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे माहे ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यामध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती चौकशी करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

मागील ३ आर्थिक वर्षात कोणतीही ऑपरेशन थिएटर निर्मिती व उपकरणे खरेदी करण्यात आलेली नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळांमधील संगणक बंद असल्याबाबत

**(४७) ७१७१२ (१६-०१-२०१७). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी खरेदी केलेले ९५ % संगणक बंद असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संगणक बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू संगणकाचा पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळामार्फत संगणक कक्ष तयार करणे. नविन संगणक खरेदी करणे. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याकरीता शिक्षक उपलब्ध करुन देणे. इत्यादी बाबींचे नियोजन केले जाते. सद्य: ११८ इमारतीमधून ११८ संगणक कक्ष उपलब्ध आहेत.

एकुण २००० संगणकांपैकी सन २००४ पासून अस्तित्वात असलेली सुमारे ७०० संगणक सद्य:स्थितीत बंद आहेत. सदर बंद संगणक दुरुस्तीबाबतचे कार्यादेश देण्यात आले असून संगणक दुरुस्तीचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद महापालिकेने संपादीत केलेल्या जमीनीबाबत

**(४८) ७१७५८ (१६-०१-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महापालिकेने कोट्यावधी रुपयांचा मोबदला देवून जमीनी संपादीत केल्या परंतु प्रत्यक्ष ताब्यात न घेतल्यामुळे अनेक मोकळ्या जागा भु-माफीयांनी बळकावल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक नगरसेवकांनी संपादीत केलेल्या जमीनींचा ग.क्र. व स.क्र. सह तपशिल देवून व या जमीनी विकास आराखड्यात असल्याचा पुरावा देवुन त्यावर आरक्षण असल्याचेही दर्शविले परंतु तक्रार करुनही अतिक्रमण विरोधी पथकाकडून याबाबत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने संबंधीत अधिकारी व कर्मचारी तसेच इतर संबंधीतांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे भूसंपादनाची कार्यवाही करतेवेळी संपादीत जमिन + रितसर कागदपत्रांच्या आधारे महानगरपालिकेकडे हस्तांतरित करुन घेतल्या जातात. मात्र दरम्यान हस्तांतरित जमीनीवर कालांतराने अतिक्रमण झाल्याचे आढळल्यास त्यावर नियमानुसार तातडीने कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देसाईगंज नगरपरिषदेतील (जि.गडचिरोली) केंद्र शासनाच्या एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजनेबाबत

**(४९) ७२३५८ (१६-०१-२०१७). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देसाईगंज नगर परिषदेत (जि.गडचिरोली) केंद्र शासनाच्या एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमाअंतर्गत सन २००९ मध्ये किती घरकुल बांधकामास मंजुरी प्रदान करण्यात आली होती व त्याला किती निधी मंजुर करण्यात आला,

(२) असल्यास, आतापर्यंत किती घरकुलांची कामे पूर्ण झाली आहे व त्यावर किती निधी खर्च करण्यात आला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२४-०४-२०१७) :** (१) देसाईगंज नगरपरिषदेतंर्गत केंद्र पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रमातंर्गत सन २००९ मध्ये एकूण ५०४ घरकुल बांधकाम व भौतिक सुविधेची एकूण १७ विभिन्न कामासाठी एकूण रु.२०५.२२६ लक्ष निधीच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.
(२) सदर योजनेतील ५०४ घरकुल पैकी ४७१ घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून ३२ घरकुलांचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. यासाठी एकूण ५६१.८७१ लक्ष खर्च झालेला आहे उर्वरीत १ घरकुलाच्या जमीनीसंबंधी वाद असल्यामुळे काम सुरु होऊ शकले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील वडगाव शेरी भागात वाढीव भावाने पाणी विक्री करण्यात येत असल्याबाबत**

**(५०) ८०७०४ (२१-०४-२०१७). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील वडगाव शेरी भागातील काही भागांमध्ये पाणी माफिया, टँकर माफिया जनतेस वाढीव भावाने पाणी विक्री करीत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत पुणे महानगरपालिका किंवा शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :** (१) व (२) वडगांवशेरी पंपींग टँकर भरणा केंद्र येथून नगर रोड वडगांवशेरी क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत असणा-या प्रभाग ३, ४ व ५ याठिकाणी टँकरद्वारे व गावठाणातील काही भागात पंपिंगद्वारे पाणी पुरवठा केला जातो. तेथे पुणे महानगरपालिकेच्या दोन टँकरने सुध्दा पाणी पुरवठा केला जातो. या केंद्रावरुन सुमारे १८ ते २० खाजगी पास धारकांना टँकर भरुन मिळण्यासाठी परवानगी दिली आहे. असे सुमारे ११० ते १३० टँकर्सने प्रतिदिनी पाणी पुरवठा केला जातो. सदरच्या ठिकाणी प्रत्येक गाडीला GPS System यंत्रणा बसविली असल्याने फक्त महानगरपालिका हद्दीमध्ये पाणी पुरवठा केला जातो. त्यामुळे वाढीव भावाने पाणी विक्री केली जाते अशी वस्तुस्थिती नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.